माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल केलेली तक्रार**

**क्र.मुमाआ/नों.क्र.१३२/२२/त.क्र.२८/२५/०१**

**श्री.मंगेश कृष्णा घाडी**

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सह प्रमुख कामगार अधिकारी, **प.उप.**
मालमत्ता विभाग, बृ.मुं.म.पा. मुख्यालय विस्तारीत इमारत,
४ था मजला, महापालिका मार्ग, मुंबई-४०० ००१.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रमुख कामगार अधिकारी, **प.उप.**
बृ.मुं.म.पा. मुख्यालय विस्तारीत इमारत,
४ था मजला, महापालिका मार्ग, मुंबई-४०० ००१.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : १८.११.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर तक्रारीवर आज दि.१८.११.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान तक्रारदार, विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणी तक्रारदार श्री.घाडी यांनी दाखल केलेल्या कलम १८ अंतर्गत तक्रार अर्जावर तत्कालिन द्वितीय अपिल अर्जात पारित झालेल्या आदेशाचे अनुपालन झाले नसून दिलेली माहिती ही अर्धवट असल्याचा आक्षेप नोंदविला आहे. तथापि, सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकनावरुन तक्रारदार यांना दि.१४.११.२०२१ रोजी पारित आदेशाचे अनुपालन झाले असून यात कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती ही प्रदान करण्याचे प्रयत्न झाले असता तक्रारदार यांनी बेस्ट-५ नुसार गुण कमी करण्याबाबत परिपत्रक देण्यात यावे अशी आग्रही विनंती केली असून अशा प्रकारचे कुठलेही परिपत्रक उपलब्ध नसल्याबाबत तत्कालिन जन माहिती अधिकाऱ्यांनी तक्रारदारांना सूचित केले असून आज झालेल्या सुनावणीत तक्रारदार यांचा मुख्य आक्षेप हा त्यांचा मुलगा कुणाल मंगेश घाडी यास जास्त गुण असतानाही त्यांची निवड झाली नसून त्याच्यापेक्षा कमी गुण असलेले उमेदवारांना नेमणूक देण्यात आली असून यात सदोष निवड प्रक्रिया असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. मात्र झालेली निवड प्रक्रिया व त्यासाठी ठरविण्यात आलेले निवड निकष त्याप्रमाणे अंतिम निवड झालेल्या उमेदवारांची सूची याबाबतीत तक्रारदार श्री.घाडी यांनी योग्य त्या प्रशासकीय प्राधिकरणाकडे दाद मागणे अपेक्षित असून निवड प्रकिया ही सदोष असल्याबाबत द्वितीय अपिल अर्ज अथवा तक्रार अर्ज दाखल करणे ही बाब प्रथम दर्शनी माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतूदींशी विसंगत असल्याची बाब लक्षात घेता प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढून नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**आदेश**

**वरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Mah...

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १८.११.२०२५**

jyotsna